<u>नियमित दिवाणी मुकदमा क्र.३७४/२०१४ मधील नि.क्र. १९२ वरील आदेश</u>

१. वादीने याने प्रस्तुतचा अर्ज मयत प्रतिवादी क्र. ८अ अशोक दामोदर पोळ यांचे वारस अभिलेखावर घेणेस झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादी तर्फे कुलमुखत्यार याने अर्ज कथनांच्या पुष्टयर्थ नि.क्र.१९३ वर त्याचे शपथपत्र दाखल केले आहे.

२. वादी याने प्रस्तुतचा दावा, प्रतिवादी यांचे विरुध्द वाद मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप व पृथ्थक कब्जासाठी दाखल केलेला आहे. वादी असे कथन करतो की, प्रस्तुत दाव्याचे कामकाज सुनावणीकरीता प्रलंबित असताना दाव्यातील प्रतिवादी क्र. ८अ हे दिनांक २४.०३.२०२५ रोजी मयत झालेले आहेत. सदर प्रतिवादी क्र. ८अ हे मयत झाल्याची माहिती वादीस वेळेत मिळाली नव्हती. तसेच त्यांच्या मृत्यूचा दाखला देखील वादीस वेळेत उपलब्ध झालेला नव्हता. मयत प्रतिवादी क्र. ८अ यांचा मुलगा, मुलगी व पत्नी असे वारस आहेत. मयत प्रतिवादीचे वारस दाव्याच्या कामी पटलावर घेणे आवश्यक आहे, ही बाब वादी यांना माहिती नव्हती. त्यामुळे त्यांचे वकीलांशी देखील बोलणे झालेले नव्हते. प्रतिवादी क्र. ८अ चे वारस दाव्याचे कामी पटलावर घेणे आवश्यक व जरुरीचे आहे.

३. वादी पुढे असे कथन करतो की, वादी यास प्रतिवादी क्र. ८अ चे वारस अभिलेखावर घेण्याकरीता साधारणतः सात महिन्याचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब हा जाणिवपूर्वक व मुद्दामहून झालेला नाही. वादी यास प्रतिवादी क्र. ८अ मरण पावलेबाबत वेळेत माहिती मिळालेली नाही व त्याचे वारस दाव्याचे कामी अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. वादी यास उपरोक्त नमूद कररणास्तव झालेला ७ महिन्यांचा विलंब माफ होऊन मिळणे अत्यंत आवश्यक व जरुरीचे आहे. सदरचा विलंब माफ करुन मयत प्रतिवादी क्र. ८अ चे वारस दाव्याचे कामी अभिलेखावर घेतल्यास प्रस्तुत दाव्याचे न्यायनिर्णय गुणवत्तेवर देणेस त्याची मदतच होणार आहे. करीता, वादी यांना मयत प्रतिवादी क्र. ८अ अशोक दामोदर पोळचे वारस पटलावर घेणे करीता, झालेला सात महिन्यांचा विलंब माफ करण्यात यावा व प्रस्तुतचा अर्ज मंजूर करावा अशी वादीने विनंती केली आहे.

४.	प्रतिवादी क्र. ९ याने प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन आक्षेप नोंदवला आहे. प्रतिवादी क्र. ९ कथन करतो की, प्रस्तुत अर्जातील मजकुर खोटा व लबाडीचा असून तो प्रतिवादीस मान्य नाही. अर्जात दिलेले कारण योग्य व न्यायीक नाही. करीता, प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी प्रतिवादी क्र. ९ याने विनंती केली. प्रतिवादी क्र. १ ते ८ यांनी प्रस्तुत अर्जास त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ८ यांचे म्हणण्याशिवाय चालविणेत येत आहे.

५.	वादीचे व प्रतिवादी क्र. ९ चे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

६.	प्रस्तुत अर्जाचे व अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीचे वारसांनी नि.क्र.१९८/२ अन्वये मयत वादी अशोक दामोदर पोळ यांचे मृत्यू प्रमाणपत्र अभिलेखात दाखल केले आहे. सदर मृत्यू प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. ८अ मयत अशोक दामोदर पोळ हे दिनांक २४.०३.२०२५ रोजी मयत झाले आहेत. माझ्या मते, प्रस्तुत दाव्याचा निकाल अंतिम गुणवत्तेवर होणेसाठी मयत प्रतिवादी क्र. ८अ चे वारसांना अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करणे न्यायोचित ठरेल. याउलट अर्ज नामंजूर केलेस मयत प्रतिवादी क्र. ८अ चे वारसांना प्रस्तुत दाव्यात हजर होवून त्यांची बाजू मांडण्याची भविष्यात संधी मिळणार नाही. दाव्यांची गुंतागुंत वाढेल. करिता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

## <u>आदेश</u>

१. अर्ज खर्च र. रु. ३००/- (र. रु. तिनशे) सह मंजूर करण्यात येतो.

२. वादीने खर्चाची रक्कम प्रतिवादींना दयावी.

SALIM PIRMAHAMAD SAYYAD

Digitally signed by SALIM PIRMAHAMAD SAYYAD
Date: 2026.01.22 15:27:22 +0530

दि.२०.०१.२०२६.

(सलीम पा. सय्यद )

२रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, वडूज.

**<u>नियमित दिवाणी मुकदमा क्र. ३७४/२०२०१४ मधील नि.क्र. १९४ वरील आदेश</u>**

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज मयत प्रतिवादी क्र. ८अ अशोक दामोदर पोळ यांचे विरूध्द आपोआप पारित झालेला दावा अबेट आदेश रद्दबातल होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादीचे कुलमुखत्यार यांनी प्रस्तुत अर्ज कथनांच्या पुष्टयर्थ नि.क्र.१९५ वर त्याचे शपथपत्र दाखल केले आहे.

२. वादी याने प्रस्तुतचा दावा, प्रतिवादी यांचे विरुध्द वाद मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप व पृथ्थक कब्जासाठी दाखल केलेला आहे. वादी असे कथन करतो की, प्रस्तुत दाव्याचे कामकाज सुनावणीकरीता प्रलंबित असताना दाव्यातील प्रतिवादी क्र. ८अ हे दिनांक २४.०३.२०२५ रोजी मयत झालेले आहेत. सदर प्रतिवादी क्र. ८अ हे मयत झाल्याची माहिती वादीस वेळेत मिळाली नव्हती. तसेच त्यांच्या मृत्यूचा दाखला देखील वादीस वेळेत उपलब्ध झालेला नव्हता. मयत प्रतिवादी क्र. ८अ यास मुलगा, मुलगी व पत्नी असे वारस आहेत. मयत प्रतिवादी क्र. ८अ चे वारस दाव्याच्या कामी पटलावर घेणे आवश्यक आहे, ही बाब वादी यांना माहिती नव्हती. प्रतिवादी क्र. ८अ चे वारस दाव्याचे कामी पटलावर घेणे आवश्यक व जरुरीचे आहे.

३. वादी पुढे असे कथन करतो की, वादी यास प्रतिवादी क्र. ८अ चे वारस अभिलेखावर घेण्याकरीता साधारणतः सात महिन्याचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब हा जाणिवपूर्वक व मुद्दामहून झालेला नाही. वादी यास प्रतिवादी क्र. ८अ मयत झालेबाबत वेळेत माहिती मिळालेली नाही व त्यांचे वारस दाव्याचे कामी अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र. ८अ यांचे विरुध्द प्रस्तुत दावा अबेट झालेला आहे. सदरचा अबेटमेंट आदेश रद्द केल्याने प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होत नाही. उलट सदरचा आदेश रद्द केला नाही तर प्रतिवादी क्र. ८अ चे वारसांना पटलावर घेता येणार नाही व त्यामुळे त्यांना त्यांची बाजू प्रस्तुत दाव्यात मांडण्याची संधी मिळणार नाही व विनाकारण, दावे, कज्ञांची संख्या वाढणार आहे. करीता, वादी यांना मयत प्रतिवादी क्र. ८अ अशोक दामोदर पोळ यांचे विरुध्द आपोआप पारित झालेला दावा अबेटचा आदेश रद्द होवून मिळावी अशी वादी याने विनंती केली आहे.

४.		प्रतिवादी क्र. ९ याने प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन आक्षेप नोंदवला आहे. प्रतिवादी क्र. ९ कथन करतो की, प्रस्तुत अर्जातील मजकुर खोटा व लबाडीचा असून तो प्रतिवादी मान्य नाही. अर्जात दिलेले कारण योग्य व न्यायीक नाही. करीता, प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेची विनंती केली. प्रतिवादी क्र. १ ते ८ यांनी प्रस्तुत अर्जास त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ८ यांचे म्हणण्याशिवाय चालविणेत येत आहे.

५.		वादीचे व प्रतिवादी क्र. ९ यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

६.		प्रस्तुत अर्जाचे व अभिलेखावर दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी यांनी दस्त यादी नि.क्र. १९८ वर मयत प्रतिवादी क्र. ८अ अशोक दामोदर पोळ यांचे मृत्यू प्रमाणपत्र दाखल केले आहे. सदर मृत्यू प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. ८अ अशोक दामोदर पोळ हे दिनांक २४.०३.२०२५ रोजी मयत झालेले आहेत. वादी यांनी दाखल केलेल्या दाव्याचा व प्रस्तुत अर्जाचा विचार करता मयत प्रतिवादी क्र. ८अ यांचे वारसांनी विहीत वेळेत त्यांना प्रतिवादीपणात समाविष्ट न करुन घेतल्यामुळे प्रस्तुत दावा आपोआप अबेट झाला आहे व सदर आदेश रद्दबातल केल्यास मयत प्रतिवादी क्र. ८अ यांचे वारसांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळेल. अन्यथा दाव्यांची गुंतागुंत वाढेल. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

## <u>आदेश</u>

१.	अर्ज खर्च र. रु. ३००/- (र. रु. तिनशे) सह मंजूर करण्यात येतो.

२.	वादी याने खर्चाची रक्कम प्रतिवादीस दयावी.

SALIM PIRMAHAMAD SAYYAD

Digitally signed by SALIM PIRMAHAMAD SAYYAD
Date: 2026.01.22 15:27:32 +0530

दिनांक २०.०१.२०२६.

(सलीम पी. सैय्यद )

२रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, वडूज.

<u>नियमित दिवाणी मुकदमा क्र. ३७४/२०१४ मधील नि.क्र.१९६ वरील आदेश</u>

०१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज मयत प्रतिवादी क्र. ८अ यांचे वारस अभिलेखावर घेणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादीने अर्ज कथनांच्या पुष्टयर्थ नि.क्र.१९७ वर शपथपत्र दाखल केले आहे.

०२. वादी यांनी प्रस्तुतचा दावा, प्रतिवादी यांचे विरुध्द सरस निरस मानाने वाटप व पृथ्थक कब्जा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. वादी असे कथन करतो की, प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. ८अ. अशोक दामोदर पोळ हे दिनांक २४.०३.२०२५ रोजी मयत झाले आहेत. सदर मयत प्रतिवादी क्र. ८अ यांना मुलगा, पत्नी व मुलगी असे कायदेशीर वारस आहेत. प्रतिवादी क्र. ८अ चे वारसांना दावा चालवण्याचा हक्क उरत आहे. करीता, मयत प्रतिवादी क्र. ८अ चे नावास कंस करण्यात येऊन खालील प्रमाणे त्यांचे वारस दाव्याच्या सरनाम्यामध्ये नोंदवण्यात यावेत, अशी वादी विनंती करतो.

प्रतिवादी क्र. ८अ अशोक दामोदर पोळ मय तर्फे वारस,

प्रतिवादी ८अ-१. अक्षय अशोक पोळ, वय – ३० वर्षे, धंदा - शेती,

प्रतिवादी ८अ-२. श्रीमती शबूताई अशोक पोळ, वय – ५५ वर्षे, धंदा - घरकाम,
प्रतिवादी क्र. ८अ१ व ८अ२ रा. मु. पो. दत्त मंदिराजवळ,
खारदेवनगर, घाटला, ३०/०६, गजानन रहिवाशी संघ, अरविंद
पाटील वाडी चेंबूर, मुंबई नं. ४०००७१.

प्रतिवादी ८अ-३. सौ. अर्चना रविराज काळे, वय – २८ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. आटके, तालुका - कराड, जिल्हा - सातारा.

०३. वादी पुढे असे कथन करतो की, प्रतिवादी क्र. ८अ यांना वर नमूद केलेप्रमाणे कायदेशीर वारस आहेत, यापेक्षा वेगळे जादा कोणीही वारस नाही. सदरचे वारसांना दावा चालविण्याचा हक्क आहे. करीता, त्यांना दाव्याच्या कामी सरनाम्यात नोंदवण्यात यावे, अशी वादीने विनंती केली आहे.

०४.	प्रतिवादी क्र. ९ याने प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन आक्षेप नोंदवला आहे. प्रतिवादी क्र. ९ कथन करतो की, प्रस्तुत अर्जातील मजकुर खोटा व लबाडीचा असून तो प्रतिवादी मान्य नाही. अर्जात दिलेले कारण योग्य व न्याय नाही. करीता, प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेची विनंती केली. प्रतिवादी क्र. १ ते ८ यांनी प्रस्तुत अर्जास त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज प्रतिवादीचे म्हणण्याशिवाय चालविणेत येत आहे.

०५.	वादी व प्रतिवादी क्र. ९ यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०६.	प्रस्तुत अर्जाचे व अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी यांनी दस्त यादी नि.क्र.१९८/१ वर मयत प्रतिवादी क्र. ८अ अशोक दामोदर पोळ यांचे मृत्यू प्रमाणपत्र दाखल केले आहे. सदर मृत्यू प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. ८अ अशोक दामोदर पोळ हे दिनांक २४.०३.२०२५ रोजी मयत झालेले आहेत. वादीचे अर्ज नि.क्र.१९२ प्रमाणे त्यांना प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी क्र. ८ अ चे वारसांना प्रतिवादीपणात सामील करणेस झालेला विलंब माफ होवून मिळावा म्हणून अर्ज दाखल केला होता. सदर अर्ज निकाली काढणेत आला आहे व मयत प्रतिवादी क्र. ८ अ चे वारसांना प्रतिवादीपणात सामील करणेस झालेला विलंब माफ करणेत आलेला आहे. प्रतिवादी क्र. ८ अ चे वारसांना प्रतिवादीपणात नि.क्र.१९४ वर अभिलेखावर घेण्यासाठी उशिर झाल्यामुळे प्रस्तुत दावा आपोआप अबेट झाल्याचा आदेश रद्द होवून मिळणेकरीता अर्ज दाखल केला आहे. सदर अर्ज निकाली काढणेत येवून मयत प्रतिवादी क्र. ८अ विरुध्द आपोआप पारीत झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात आला आहे. माझ्या मते, प्रस्तुत प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढणेसाठी मयत प्रतिवादी क्र. ८अ चे वारसांना अभिलेखात प्रतिवादीपणात सामील करणे आवश्यक आहे. नक्कीच मयत प्रतिवादी क्र. ८ अ चे वारसांना प्रस्तुत दाव्यात प्रतिवादीपणात सामील न केल्यास, प्रकरण अंतिमतः निकाली काढणे शक्य ठरणार नाही. दाव्याची गुंतागुंत वाढेल. करिता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

<u>**आदेश**</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने मयत प्रतिवादी क्र. ८अ चे वारसांना प्रस्तुत प्रकरणात १४ दिवसांच्या आत प्रतिवादीपणात सामील करून घ्यावे.

SALIM PIRMAHAMAD SAYYAD

Digitally signed by SALIM PIRMAHAMAD SAYYAD
Date: 2026.01.22 15:27:44 +0530

दि.२०.०१.२०२६.

(सलीम पी. सैय्यद )
२रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, वडूज.